# मराठी विभाग

## Book Bank Questions

## (शैक्षणिक वर्ष २०१९—२०)

## प्रथम सत्र

### विषय :— मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (प्रारंभ ते १६००)

---

**वर्ग :— एम. ए. भाग १** **पेपर क्रमांक :— २**

**विषय कोड नं. :—MAR 4102** **—प्रा. मुक्ता राजेंद्र आंभेरे**

---

### प्रश्नांचे स्वरूप

**अ) वस्तुनिष्ठ प्रश्न —**

१. आचलित, करवुन, करित यासारखे मराठी शब्द कोणत्या ताम्रपटावर कोरलेले दिसतात?

अ) चिकुर्डे ब) अक्षी

क) मठगाव ड) पंढरपूर

२. 'श्री चामुण्डराजें करवियले.......' हे सुप्रसिद्ध वाक्य पुढीलपैकी कोणत्या शिलालेखावर कोरले आहे?

अ) अक्षीचा शिलालेख ब) श्रवणबेळगोळचा शिलालेख

क) पंढरपूरचा शिलालेख ड) पळसदेवचा शिलालेख

३. मुकूंदराजांचे जन्मस्थल कोणते आहे?

अ) आंबेजोगाई (बीड) ब) अंभोरे (मध्यप्रदेश)

क) पंढरपूर (सोलापूर) ड) खेडले (भोपाळ)

४. महानुभाव पंथाचे प्रवर्तक कोण आहेत?

अ) श्रीगोविंदप्रभू ब) नागदेवाचार्य

क) चक्रधरस्वामी ड) नरेंद्रस्वामी

५. उद्धवगीता हा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) नरेंद्र ब) भास्करभट बोरीकर

क) रवळोव्यास ड) दामोदर पंडित

६. बिनचुन्याच्या इमारती आणि बाजरीचे पीक यांची ओळख महाराष्ट्राला कोणी दिली?

अ) महदंबा ब) चक्रधरस्वामी

क) तात्याजी महिपती ड) हेमांडपंडित

७. मराठीतील आद्यग्रंथ असे कोणत्या ग्रंथास म्हटले जाते?

अ) रूक्मिणीस्वयंवर ब) लीळाचरीत्र
क) शिशुपालवध ड) विवेकसिंधू

८. 'मराठी वाङ्मयाच्या पहाटेचा शुक्रतारा' असे कोणास संबोधले जाते?
अ) संत ज्ञानेश्वर ब) चक्रधरस्वामी
क) हेमांडपंडित ड) मुकूंदराज

९. 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाचा रचनाकाळ सांगा.
अ) इ.स. १२६० ब) इ.स. १२९०
क) इ.स. १२९२ ड) इ.स. १२९५

१०. 'चांगदेवपासष्टी' च्या ग्रंथकाराचे नाव सांगा.
अ) संत नामदेव ब) संत ज्ञानेश्वर
क) तात्याजी महिपती ड) मुकूंदराज

११.कोणत्या संताचे 'गुरू ग्रंथसाहेब' या शीख धर्मग्रंथामध्ये ५० अभंग आहेत?
अ) संत ज्ञानेश्वर ब) संत रामदास
क) संत नामदेव ड) संत तुकाराम

१२. 'ताटीचे अभंग' रचणाऱ्या संत कवयित्रीचे नाव सांगा.
अ) संत मुक्ताबाई ब) संत जनाबाई
क) संत बहिणाबाई ड) संत कान्होपात्रा

१३. 'उस डोंगा परी रस नव्हे डोंगा...' हा सुप्रसिद्ध अभंग कोणी लिहिला?
अ) संत चोखामेळा ब) संत नामदेव
क) संत तुकाराम ड) संत ज्ञानेश्वर

१४. 'प्रतिक्षणी प्रतिक्षणी त्यागु...' ही आचारसंहिता कोणत्या संप्रदायाची होती?
अ) नाथ संप्रदाय ब) भागवत संप्रदाय
क) दत्त संप्रदाय ड) महानुभाव संप्रदाय

१५. संत नामदेवांच्या गुरूंचे नाव सांगा.
अ) विसोबा खेचर ब) संत गोरा कुंभार
क) संत ज्ञानेश्वर ड) पारिसा भागवत

१६. कोणती संत कवयित्री 'नामयाची दासी' असे स्वत:ला अभिमानाने म्हणते?
अ) संत मुक्ताबाई ब) संत बहिणाबाई
क) संत जनाबाई ड) संत कान्होपात्रा

१७. उषा आणि अनिरूद्ध यांच्यावर आधारीत कथाकाव्याचे नाव सांगा?
अ) भावार्थ रामायण ब) गीतार्णव
क) गुरूचरित्र ड) उखाहरण

१८. मराठीतील पहिले भावकवी, आख्यानकवी व आत्मचरित्रकार असे कोणास म्हटले जाते?

अ) संत चोखामेळा ब) संत नामदेव

क) संत एकनाथ ड) संत ज्ञानेश्वर

१९. 'दत्त दत्त ऐसे लागले ध्यान.....' ही प्रख्यात दत्तात्रयाची आरती कोणी लिहिली?

अ) संत ज्ञानेश्वर ब) संत नामदेव

क) संत एकनाथ ड) संत ज्ञानेश्वर

२०. श्री. चक्रधरस्वामी यांच्या लीळा कोणत्या ग्रंथात संकलित केल्या आहेत?

अ) ऋद्धिपूरवर्णन ब) सूत्रपाठ

क) शिशुपालवध ड) लीळाचरित्र

२१. रा. चि. ढेरे यांनी कोणत्या मुस्लिम संतकवीचे वर्णन 'गीतागंगेत पावन झालेला यवन' असे केले आहे.

अ) शेख महंमद ब) हुसेन अंबर

क) दासोपंत ड) फादर स्टीफन

२२. खालील ओवी पूर्ण करा.

'जैसा हरळामाजी ..........................।

..................................................।।'

२३. संत एकनाथांचा अपूर्ण राहिलेला कोणता ग्रंथ त्यांच्या गावबा या शिष्याने पूर्ण केला?

अ) भावार्थ रामायण ब) चतु:श्लोकी भागवत

क) रूक्मिणी स्वयंवर ड) एकनाथी भागवत

२४. तत्कालीन महाराष्ट्राचे काशीक्षेत्र व संस्कृत धर्मग्रंथाच्या अभ्यासाचे पीठ असे कोणत्या स्थानास संबोधले जात होते?

अ) आळंदी ब) पैठण

क) नेवासा ड) पंढरपूर

२५. हरिपाठाचे अभंग कोणी लिहिले?

अ) संत ज्ञानेश्वर ब) संत नामदेव

क) संत एकनाथ ड) संत ज्ञानेश्वर

**ब) एका वाक्यात उत्तरे –**

१. साहित्यिक भाषेत शिलालेख म्हणजे काय?

२. इतिहासाच्या दृष्टिने वाङ्मयाची अस्सल साधने कोणती आहेत?

३. मध्ययुगीन काळात ग्रंथनिर्मिती प्रामुख्याने कोणत्या संस्कृत ग्रंथाच्या आधारे केली आहे?

४. मराठी साहित्यातील पहिला चरित्रग्रंथ कोणता?

५. महानुभाव संप्रदायाचे आद्यपुरूष श्री.गोविंदप्रभू यांच्या स्वभावाचे दोन ठळक विशेष सांगा.

६. नाथसंप्रदायाची परंपरा विशद करा.
७. वारकरी संप्रदायाला इतर कोणत्या नावाने संबोधले जाते?
८. वारकरी संप्रदायातील अठरापगड जातीच्या पाच प्रमुख संतांची नावे सांगा.
९. नाथसंप्रदायातील दोन सिद्ध पुरूषांची नावे सांगा.
१०. एकनाथपंचक असा कोणाचा उल्लेख केला जातो?
११. 'वारियाने कुंडल हाले! डोळे मोडीत राधा चाले' ही सुप्रसिद्ध गौळण कोणाची आहे?
१२. मराठी भाषेचा अभिमान ज्ञानेश्वरांच्या कोणत्या ओवीतून स्पष्ट होतो?
१३. संत एकनाथांची अष्टपैलू साहित्यसंपदा कोणकोणती आहे?
१४. प्राचीन मराठीत 'रूक्मिणीस्वयंवर' या विषयावर आधारीत ग्रंथरचना कोणकोणत्या लेखकांनी केली आहे?
१५. मराठी आख्यानक कविता म्हणजे काय? ते सांगा.
१६. संतमेळयातील कवींनी आपल्या अभंगांतून कोणती मुलभूत तत्त्वे सांगीतली आहेत?
१७. मध्ययुगीन काळातील मुस्लीम धर्मीय कवींची नावे सांगा.
१८. संत एकनाथांनी भारूडातून कोणकोणती व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत?
१९. किर्तन परंपरेचे आद्य प्रवर्तक कोण आहेत?
२०. 'विवेकसिंधू' या ग्रंथातील कोणतीही एक ओवी लिहा.
२१. महानुभाव संप्रदायाचे पवित्र तीर्थक्षेत्र कोणते?
२२. धवळयांच्या उत्तरार्धाचे कर्तृत्त्व कोणाकडे जाते?
२३. ओवी आणि अभंग या काव्यप्रकारातील ठळक फरक सांगा?
२४. वारकरी संप्रदायाचा षडाक्षरी मंत्र काय आहे?
२५. संतमेळयाची अभंगवाणी कोणत्या ग्रंथामध्ये एकत्रितपणे संकलित केली आहे?

**क) टीपा द्या —**

१. कोरीव लेख — एक अक्षर लेणे
२. ताम्रपटांचे स्वरूप
३. महानुभाव संप्रदायाचे प्रणेते — चक्रधर
४. महदंबेचे धवळे
५. ज्ञानेश्वर एक की दोन?
६. नरेंद्र — रूक्मिणीस्वयंवर
७. चतु:श्लोकी भागवत
८. चोंभाविरचित उखाहरण
९. दत्त संप्रदाय
१०. नाथांची पदे आणि गौळणी

११. ज्ञानेश्वरीतील काव्य
१२. फादर स्टीफन्स – ख्रिस्तपुराण
१३. मध्ययुगीन काळातील जैनधर्मीय कवी
१४. महानुभावीयांचे चरित्रग्रंथ
१५. वारकरी संप्रदायातील सर्वसमावेशकता

**ड) लघुत्तरी प्रश्न –**

१. कोरीव लेखांमध्ये आढळलेल्या मराठी भाषेचे स्वरूप स्पष्ट करा.
२. यादवकाळातील महाराष्ट्राच्या धार्मिक परिस्थितीचा आढावा घ्या.
३. महानुभावीयांच्या आचारधर्माचा थोडक्यात परिचय करून द्या.
४. यादवकालीन मराठी भाषेचा थोडक्यात आढावा घ्या.
५. संत साहित्याच्या निर्मितीमागील प्रेरणांचा शोध घ्या.
६. संत मुक्ताबाईच्या कुट अभंगाचा भावार्थ उलगडून दाखवा.
७. संत कवयित्रींच्या अभंगाचे स्वरूप विशद करा.
८. ज्ञानेश्वरी या ग्रंथात कोणकोणत्या विषयावर विवेचन केले आहे, याचा आढावा घ्या.
९. नाथकालीन महाराष्ट्राच्या सामाजिक परिस्थितीचे स्वरूप सांगा.
१०. संत एकनाथांच्या रूक्मिणीस्वयंवर या ग्रंथातील सौंदर्यस्थळांचा शोध घ्या.
११. दलितांवर झालेल्या सामाजिक अन्यायाची सल संत चोखामेळा यांनी अभंगातून कशा प्रकारे व्यक्त केली आहे? ते सांगा.
१२. वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान संत नामदेवांनी कोणकोणत्या अभंगातून स्पष्ट केले आहे.
१३. संत ज्ञानेश्वरांच्या अभंगवाणीचे स्वरूप स्पष्ट करा.
१४. 'तीर्थावळीच्या अभंगांचे' वैशिष्टय काय आहे?
१५. संत साहित्याच्या सामाजिक पार्श्वभूमीचे थोडक्यात विवेचन करा.
१६. जैनधर्मीय कवींच्या काव्याचा थोडक्यात आढावा घ्या.
१७. संत एकनाथांना समन्वयकार एकनाथ असे का म्हटले जाते? ते सांगा.
१८. नामभक्तीचा महिमा सांगणारे कोणतेही पाच अभंग लिहा.
१९. संतचळवळीचे स्वरूप थोडक्यात सांगा.
२०. संतांची साहित्यनिर्मितीमागील भूमिका स्पष्ट करा
२१. महानुभावीयांच्या काव्याचे वैशिष्टय व वेगळेपण स्पष्ट करा.
२२. वारकरी आणि महानुभाव या दोन्ही संप्रदायातील फरक सांगा.
२३. मराठी आख्यानक कवितेचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करा.
२४. व्यवसायात विठ्ठल पाहणाऱ्या संतमंडळींच्या अभंगांचा परामर्श घ्या.
२५. दामोदर पंडीत यांच्या वछाहरण या ग्रंथाचे स्वरूप सांगा.

**ई) दीर्घोत्तरी प्रश्न –**

१. प्रारंभ ते १६०० या कालखंडातील मराठी साहित्याच्या प्रेरणा व प्रवृत्तींचा आढावा घ्या.
२. कोरीव लेख व ताम्रपट यांचे साहित्याच्या इतिहासातील महत्त्व विशद करा.
३. मराठी भाषेची व्युत्पत्ती सांगून भाषेतील स्थित्यंतरांचा परामर्श घ्या.
४. आद्यकवी मुकूंदराज यांच्या ग्रंथनिर्मितीचे स्वरूप सांगा.
५. महानुभावीयांच्या साती ग्रंथांचा परामर्श घ्या.
६. मराठी गद्याची मुहूर्तमेढ महानुभावांनी रोवली असे का म्हटले जाते? ते स्पष्ट करा.
७. संत मेळयाच्या अभंगवाणीचे स्वरूप स्पष्ट करा.
८. भागवत धर्माचे प्रचारक व प्रसारक म्हणून संत नामदेवांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घ्या.
९. भारूडकार एकनाथांचे वाङ्मयाच्या इतिहासातील स्थान स्पष्ट करा.
१०. संत ज्ञानेश्वर हे महाराष्ट्रातील संतचळवळीचे, धार्मिक प्रबोधनाचे आद्य प्रणेते होते – स्पष्ट करा.

*******************************